मुख्य कार्यालय,
यशवंत नगर, विरार (प.)
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०३

प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास
वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दुरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र.: व.वि.श.म./पा.पु./०७/२०२६
दिनांक : ०१/०४/२०२६.

# वसई - विरार शहर महानगरपालिका

## प्रेस नोट

## सुर्या योजनेचा पाणी पुरवठा बंद

वसई विरार शहर महानगरपालिकेस सद्य:स्थितीत ४०० द.ल.ली पाण्याची आवश्यकता असून महानगरपालिकेस सुर्या टप्पा - १ व टप्पा - ३ योजनेअंतर्गत २०० द.ल.ली. तसेच MMRDA च्या सुर्या ४०३ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेमधून १५० द.ल.ली. असा एकूण ३५० द.ल.ली. पाणी पुरवठा होत आहे.

मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दुसऱ्या टप्प्यातील तांत्रिक कामे पुर्ण करण्याकरीता दि. ०४/०४/२०२६ ते १०/०४/२०२६ पर्यंत असे एकूण ७ दिवसाकरीता Shut Down घेण्यात आलेला आहे. सदर कालावधीत MMRDA मार्फत होणारा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार असून वसई विरार शहर महानगरपालिकेस दैनंदिन होणाऱ्या पाणी पुरवठयामध्ये १५० द.ल.ली. पाण्याची तूट येणार आहे. सबब शहरास होणारा पाणी पुरवठा हा अपुऱ्या व कमी दाबाने होणार आहे. पाणी पुरवठा सुरळीत व योग्य दाबाने होण्याकरीता महानगरपालिकेमार्फत झोनिंगव्दारे पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. सदर झोनिंगचा तपशिल खालील प्रमाणे.

| दिनांक | झोन निहाय बंद (२४ तासांकरीता) |
|---|---|
| ०४/०४/२०२६ | विरार पुर्व व पश्चिम |
| ०५/०४/२०२६ | नालासोपारा पुर्व व पश्चिम |
| ०६/०४/२०२६ | नवघर. वसई |
| ०७/०४/२०२६ | विरार पुर्व व पश्चिम |
| ०८/०४/२०२६ | नालासोपारा पुर्व व पश्चिम |
| ०९/०४/२०२६ | नवघर, वसई |
| १०/०४/२०२६ | विरार पश्चिम व नालासोपारा पश्चिम |

उपरोक्त नमूद तक्त्यानुसार दिनांक निहाय सदरचे झोन सकाळी १०.०० वाजता ते दुसऱ्या दिवशी सकाळी १०.०० वाजेपर्यंत असे एकूण २४ तासांकरीता बंद राहणार आहेत.

तरी नागरीकांनी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा वापर जपून करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

अतिरिक्त आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका